नि.फौ.ख.क्र.२८५/२०२४
सरकार वि. रामदास
नि.क्र.२८.

सरकारतर्फे **साक्षदार क्रमांक ३** यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
**नाव - सुधाकर यादरवराव नागमोते,**
वय - ४३ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
राहणार – किरणापूर, ता. मौदा, जिल्हा - नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एस. जी. इंगळे यांच्यामार्फत -**

**१.** फिर्यादी माझे वडील आहे. माझ्याकडे २०-२५ एकर शेती मौजा किरणापुर शिवारामध्ये आहे. आरोपीची शेती आमच्या शेताच्या वरच्या बाजुला असल्याकारणाणे मी त्यांना ओळखतो. घटना दिनांक २१.०७.२०२४ रोजी माझे वडील फिर्यादि यांच्या शेतामध्ये घडली होती. घटनेच्या दिवशी मी दुपारी ४ वाजता आमच्या शेतामध्ये गेलो होतो. त्यावेळेस माझ्या शेतामध्ये माझे वडील फिर्यादि व मी होतो.

**२.** मी शेतामध्ये गेलो असता, मला दिसले की, आरोपीने आमच्या शेताच्या धुरा तोडून आमच्या शेतामध्ये पाणी सोडले. म्हणून माझ्या वडीलांनी आरोपीला धुरा काबर तोडला असे विचारले असता, आरोपीने माझ्या वडीलांना पाठीच्या उजव्या भागावर कु-हाड मारली होती. त्यामुळे पाठीतून रक्त वाहू लागले. त्यानंतर आरोपी तेथून पळून गेला. त्यानंतर माझ्या वडीलांनी पो.स्टे ला जावून फिर्याद दिली. त्यानंतर पोलीसांनी माझे बयाण घेतले होते.

**३.** ज्यावस्तूंनी माझ्या वडीलांना मारले ती दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता साक्षीदारास M.O-1 (कु-हाड) दाखवली. त्यानी सदरची कु-हाड आरोपीने फिर्यादिला मारता वेळी वापरल्याचे सांगितले. आरोपी आज न्यायलयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटपास आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. एम. जी. आकरे यांच्यामार्फत-**

**४.** मी ८ वी पास आहे व शेती काम करतो. आमचे व आरोपींचे शेताच्या

कारणावरून भांडण आहे. त्याबाबत आम्ही कुठेही तक्रार केली नव्हती. आमची शेती खालच्या बाजुला असून आरोपीची शेती वरच्या बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी पावसाळ्याचे दिवस होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दोन दिवसपूर्वी सतत पाउस सुरू होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांचे गावातील लोकांसोबत नेहमी भांडण होत असे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या वडीलांविरूध्द न्यायालयात अनेक खटले दाखल आहे.

**५.** हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या दिवशी आमच्या शेताचा धुरा कसा व कुणी तोडला हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे वडील आरोपी सोबत नेहमी झगडा भांडण करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की आरोपीला पाच मुली असुन सर्वांचे लग्न झाले आहे व आरोपी व त्यांची पत्नी एकटेच राहतात. हे म्हणणे खरे नाही की मी व माझे वडील झाडे कापण्याकरीता आमच्या शेतात गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळेस आरोपी त्याच्या शेतात काम करीत होता. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळेस मी व माझे वडीलांनी आरोपीसोंबत शेताच्या धु-यावरून वाद सुरू केला होता.

**६.** हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस माझे वडील आरोपीला कु-हाड घेवून मारायला धावले. हे म्हणणे खरे आहे की, पाउस आल्या कारणाणे घटनेच्या दिवशी घटनास्थळी चिखल झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे धु-याच्या पहारीला/बॉड्रीला आम्ही दगड लावले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे माझ्या वडीलांचा दगडावरून पाय घसरून माझ्या वडीलांच्या हातातील कु-हाड त्यांना स्वत: ला लागली. हे म्हणणे खरे नाही की, M.O-1 (कु-हाड) आमचीच आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या घरी कु-हाड आहे. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या वडीलांच्या सांगण्यावरून आरोपीला फसवीण्याकरीता आज खोटि साक्ष देत आहे.

**७.** हे म्हणणे खरे नाही कि, आरोपीने माझ्या वडीलाना कु-हाडी ने मारहाण केली न्वहती. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळच्या आजूबाजूला इतर शेतक-यांची शेती आहे.

त्यावेळेस पावसाळयाचे दिवस असल्याकारणाने शेतकरी नव्हते. हे म्हणणे खरे नाहि की, मी आज खोटि साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

**सा.ब.वा.दा.ब.अ.क.के.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.
दिनांक : १८.०५.२०२६

समक्ष,

Sd/-
**(एन.के. वानखडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मौदा.